**पुणे महानगरपालिका.**

जाहिरात प्रकटन,

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खालील पदांसाठी निवडयादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ क्र | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य प्रमुख (वर्ग-अ ) | रु.१५६०० ते ३९१०० + ग्रेड पे + मान्य भत्ते | The candidate must hold a medical degree registerable under the Bombay Medical Act, VI of 1912 and in addition must possess either,<br>(a) a diploma in Public Health of an Indian or foreign University or the Royal College of physicians & Surgeons or<br>(b) One of the following degrees from an Indian or Foreign University.<br>Doctor of Medicine, (State Medicine), Doctor of science, (Public Health), Bachelor, Doctor or Master of Science. He must further have experience of at least 5 years in a responsible public health post. | १ निवडयादी | खुला | आरोग्य कार्यालय |
| २ | डायरेक्टर (झू) (वर्ग-अ) | रु.१५६०० ते ३९१०० + ग्रेड पे + मान्य भत्ते | १) एम.व्ही.एस्सी.<br>२) किमान १० वर्षांचा प्राणी संग्रहालयामधील कामाचा अनुभव<br>- किंवा -<br>वन्य प्राणी देखभालीबाबत भारतीय अथवा परदेशातील विद्यापीठाची पदवी व किमान १० वर्षांचा अनुभव<br>- किंवा -<br>वन खात्याकडील असिस्टंट कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट दर्जाचा अधिकारी | १ निवडयादी | खुला | उद्यान |
| ३ | आयातकर अधिक्षक (ऑक्ट्राय सुपरिटेंडेंट) (वर्ग अ) | रु.१५६०० ते ३९१०० + ग्रेड पे + मान्य भत्ते | शैक्षणिक पात्रता :<br>कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापिठाची व कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण आवश्यक .<br>अनुभव :<br>१) कमीत कमी १० वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक. हा अनुभव जबाबदारीच्या जागेवर मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत, सरकारी कार्यालयात आणि आयातकर व अन्य सर्वसाधारण कर यांचेशी संबधित असावा.<br>२) मनपा सेवकांचेसाठी सिनीअर लेखनिक या पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) वय:<br>४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मनपा सेवकांसाठी वयाची अट लागू नाही. (मागासवर्गीयांसाठी वयाच्या अटीमध्ये ५ वर्ष शिथिलक्षम.) | १ निवड यादी | खुला | आयातकर कार्यालय |

अटी:-

१) <u>वयोमर्यादा</u> :-

(अ) जाहिरातीचे दिनांकास किमान वय १८ वर्षे पुर्ण असावे व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे .(मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम राहील).

(ब) माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त यांच्यासाठी सर्वसाधारण उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

(क) स्वातंत्र सैनिक नामनिर्देशित पाल्य/खेळाडू यांना ५ वर्ष शिथीलक्षम व जनगनना कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

(ड) पुणे महानगरपालिकेच्या सेवेत असणाऱ्या उमेदवारास कमाल वयाची अट लागु होणार नाही.

२) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

३) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

४) वरील सर्व पदांसाठी दिनांक ०७/०८/२००१ व दिनांक २०/०७/२००२ व आजपर्यंतच्या सर्व शासन निर्णयान्वये DOEACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर, किंवा A स्तर, किंवा B स्तर, किंवा C स्तर, किंवा MS-CIT परिक्षा नेमणूक झाल्यापासून २ वर्षात उत्तीर्ण होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

५) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णयानुसार नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

६) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारा रु. ५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा. महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखालील सेवकवर्ग विभाग कार्यालय, रूम नं. २४०, दुसरा मजला पुणे मनपा. मुख्य इमारत, शिवाजी नगर पुणे-५ येथे दि.२९/११/२०१० ते दि. १३/१२/२०१० अखेर (पर्यंत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दि.१४/१२/२०१० दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील.

सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.

७) विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचा अर्ज, अपुर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, वय, शैक्षणिक अर्हता-गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इत्यादी संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती (ट्रु-कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८) उपरोक्त पदावर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य राहील.

९) शासन निर्णय क्र. बीसीसी-२००/प्र.क्र. २९१/०९/१६- ब, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ५ नोव्हेंबर २००९ अन्वये मागासवर्गीय गटातील उमेदवारास नियुक्तीपूर्वी पुणे महानगरपालिकेकडे जात पडताळणी वैधता प्रमाणपत्रे (caste validity certificate) सादर करणे बंधनकारक राहील.

१०) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

११) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खातेप्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

१२) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१३) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१४) अर्जदार महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१५) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१६) रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अशंतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका हे स्वत:कडे राखून ठेवीत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

१७) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**सही/-**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका.**